**ठळक बातम्या**

- जागतिक पर्यावरण दिनानिमित्त देशभर वृक्षारोपण आणि पर्यावरण विषयक कार्यक्रम

- समृद्धी महामार्गाच्या इगतपुरी ते आमणे या अखेरच्या टप्प्याचं मुख्यमंत्र्यांच्या हस्ते उद्घाटन

- आदिशक्ती अभियानासाठी येत्या १५ दिवसात ग्रामसमित्या स्थापन करण्याचे महिला आणि बालविकास मंत्र्यांचे निर्देश

**आणि**

- नाशिकमधे चारचाकी वाहनाच्या अपघातात पाचजण ठार

**<><><><><>**

देशभरात आज जागतिक पर्यावरण दिवस साजरा केला जात आहे. पर्यावरण रक्षणाबाबत जागरूकता आणि प्रत्यक्ष कृतीला प्रोत्साहन देण्यासाठी हा दिवस साजरा केला जातो. संयुक्त राष्ट्र संघटनेनं १९७३ मध्ये आजच्या दिवशी सर्वप्रथम हा दिवस साजरा केला होता. हा दिवस १४३ हून अधिक राष्ट्रांमध्ये पर्यावरण संवर्धनाच्या विविध कार्यक्रमांच्या आयोजनाद्वारे साजरा केला जातो. ‘प्लास्टिकमुळे होणाऱ्या प्रदूषणावर मात ’ ही यंदाच्या पर्यावरण दिनाची मुख्य संकल्पना आहे.

जागतिक पर्यावरण दिनानिमित्त राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती जगदीप धनखड तसंच प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी देशवासियांना शुभेच्छा दिल्या आहेत.

**प्रधानमंत्री नरेंद्र मोदी** यांच्या नेतृत्वाखाली दिल्लीत विशेष वृक्षारोपण मोहीम राबवण्यात आली. प्रधानमंत्र्यांनी यावेळी वटवृक्षाचं रोप लावलं. ही मोहीम अरवली

हरित भिंत प्रकल्पाचा भाग आहे. या प्रकल्पात सातशे किलोमीटरच्या अरवली पर्वतरांगांमध्ये पुनर्वनीकरण केलं जाणार आहे. प्रधानमंत्र्यांनी आज आपल्या निवासस्थानी शेंदराची रोपं लावली. १९७१ च्या युद्धात शौर्य गाजवणाऱ्या कच्छ आणि गुजरातमधल्या वीरांच्या माता आणि भगिनींनी ही रोपं प्रधानमंत्र्यांना त्यांच्या कच्छ दौऱ्यात भेट दिली होती. प्रधानमंत्र्यांनी दिल्ली परिवहन सेवेच्या २० इलेक्ट्रिक बसगाड्यांना हिरवा झेंडा दाखवला.

केंद्रीय मंत्री **धर्मेंद्र प्रधान** यांनी आज पर्यावरण दिनानिमित्त नवी दिल्लीत एक पेड माँ के नाम मोहिमेच्या दुसऱ्या टप्प्याचा प्रारंभ केला.

**<><><><><>**

मुख्यमंत्री **देवेंद्र फडणवीस** यांनी वर्षा या शासकीय निवासस्थानी वृक्षारोपण केलं. पर्यावरण दिनाच्या या वर्षीच्या संकल्पनेनुसर पर्यावरणाला प्लास्टिक मुक्त करणं ही आपल्या सर्वांची जबाबदारी आहे, असं मुख्यमंत्र्यांनी आपल्या संदेशात म्हटलं आहे. राज्य शासनानं आजपासून ३१ ऑक्टोबर पर्यंत राष्ट्रीय प्लास्टिक प्रदूषण निर्मूलन मोहिमेचं आयोजन केलं असल्याचं त्यांनी सांगितलं.

**-------बाईट-----मुख्यमंत्री-----------**

जागतिक पर्यावरण दिनानिमित्त राज्यातही विविध कार्यक्रमांचं आयोजित करण्यात आलं आहे.

या निमित्तानं **मुंबईत** आज मुख्यमंत्र्यांच्या हस्ते वातावरण बदलाबाबत जनजागृती करण्यासाठी जागतिक प्रचार मोहिमेचा प्रारंभ करण्यात आला. एकदा वापरलं जाणारं प्लास्टिक पर्यावरणाचा सर्वात मोठा शत्रू असून याचा वापर थांबवणं हा पर्यावरण संवर्धनासाठीचा महत्वपूर्ण निर्णय असल्याचं मुख्यमंत्री यावेळी म्हणाले.

राज्य सरकारच्या १० कोटी वृक्षलागवड मोहिमेत नागरिकांनी सहभागी होण्याचं आवाहन त्यांनी केलं.

**छत्रपती संभाजी नगरमध्ये** पर्यावरण जागरूकतेसाठी आयोजित केलेल्या सायकल रॅलीचं उदघाटन खासदार भागवत कराड यांनी केलं.

अहिल्यानगर जिल्ह्यातल्या **हिवरे बाजार** इथल्या मातृस्मृती वनमंदिरात चौदाशे देशी वृक्षांच्या लागवडीच्या मोहिमेचा पर्यावरण दिनी प्रारंभ झाला.

**<><><><><>**

हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्गाच्या इगतपुरी ते आमणे या ७५ किलोमीटरच्या अखेरच्या टप्प्याचं उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आज इगतपुरी इथं झालं. उपमुख्यमंत्री अजित पवार आणि एकनाथ शिंदे यावेळी उपस्थित होते. समृद्धी महामार्गाच्या या टप्प्यामुळे नागपूर ते मुंबई हा प्रवास फक्त आठ तासांत करता येणार आहे.

नाशिक आणि ठाणे जिल्ह्यांमधून जाणारा या शेवटच्या टप्पा सह्याद्रीच्या पर्वतरागांमधून बोगदे आणि पुलांद्वारे पूर्ण केला आहे. यात जवळपास ११ किलोमीटर लांबीचे ५ बोगदे असून इगतपुरीतला १७ मीटरपेक्षा जास्त रुंद आणि ९ मीटरपेक्षा जास्त उंचीचा बोगदा राज्यातला सर्वात लांब आणि रुंद बोगदा आहे. या बोगद्यात बसवलेल्या 'जनरेशन व्हेइकल एक्सिट सिस्टम'चा वापर भारतात पहिल्यांदाच करण्यात आला आहे.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारला ११ वर्ष पूर्ण झाली असून या कार्यकाळात देशातल्या जनतेची आर्थिक क्षमता सुधारण्यासाठी

प्रधानमंत्री आवास योजना, प्रधानमंत्री उज्जवला योजना, जन धन योजना आणि आयुष्यमान भारत सारख्या विविध योजना शासनाने सुरू केल्या. या योजनांचा लाभ २५ कोटींहून अधिक जनतेनं घेतला असून देशातल्या पायाभूत सोयीसुविधा आणि स्वावलंबी भारत निर्माण करण्यावर केंद्रसरकार जोर देत असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी सामाजिक माध्यमांवरील पोस्टमध्ये म्हटलं आहे.

**<><><><><>**

मेट्रो रेल्वे जाळ्याचा वेगाने विस्तार होत असल्यामुळे देशातल्या शहरी वाहतूक व्यवस्थेत महत्वाचे बदल घडून येत आहेत. देशभरात मे २०२५ पर्यत एकोणतीस  शहरांमध्ये मेट्रो सुरु झाली आहे. देशातल्या मेट्रो जाळ्याचा विस्तार एक हजार  तेरा किलोमीटरवर पोचला असून मेट्रो विस्ताराच्या बाबतीत भारत जगात तिसऱ्या क्रमांकाचा देश आहे. पत्रसूचना कार्यालयाने आपल्या समाजमाध्यमावरच्या संदेशात ही माहिती दिली आहे.

**<><><><><>**

देशातली जनगणना एक ऑक्टोबर २०२६ पासून सुरू होणार असल्याचं, केंद्रीय गृहमंत्रालयानं सांगितलं आहे. ही जनगणना दोन टप्प्यात होईल. एक ऑक्टोबर २०२६ पासून जम्मू काश्मीर, लडाख, उत्तराखंड, आणि हिमाचल प्रदेशमध्ये जातनिहाय जनगणनेला सुरुवात होईल. तर १ मार्च २०२७ पासून देशातल्या उर्वरित राज्यांमध्ये जनगणना सुरू होईल.

**<><><><><>**

महिलांच्या सर्वांगीण विकासाकरिता आदिशक्ती अभियान राबवता यावं याकरिता येत्या १५ दिवसांत ग्रामसमित्या स्थापन करण्याचे निर्देश महिला आणि बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी आज मंत्रालयात झालेल्या बैठकीत दिले.

या अभियानाअंतर्गत विविध विभागांमधल्या महिलांच्या समस्या सोडवणे, हुंडा प्रथा थांबवणे, महिलांशी निगडित विविध योजनांबद्दल जनजागृती करणं असा व्यापक उपक्रम राबवला जाणार आहे.

**<><><><><>**

जिल्हा परिषद शाळेत शिक्षण घेत असलेल्या मुलांच्या पालकांची घरपट्टी आणि ग्रामपंचायतीकडून लावले जाणारे इतर कर पूर्णपणे माफ करण्याचा अनोखा निर्णय बीड जिल्ह्यातल्या नांदूर घाट ग्रामपंचायतीनं घेतला आहे. गावातली जिल्हा परिषद शाळा चालू राहावी तसंच शाळेतल्या विद्यार्थ्यांची संख्या वाढावी या उद्देशानं हा निर्णय घेतल्याचं सरपंचानी जाहीर केलं आहे.

**<><><><><>**

केंद्र सरकारनं बकरी ईदनिमित्त ६ जून २०२५ रोजी सार्वजनिक सुट्टी जाहीर केल्याचा दावा करणारी एक पोस्ट समाजमाध्यमांवर फिरत आहे. मात्र या पोस्टमधला दावा तथ्यहीन आणि बनावट असल्याचं केंद्र सरकारनं स्पष्ट केलं आहे. देशभरात अनेक भागांमध्ये ईद ६ जून रोजी साजरी केली जाणार असल्याची शक्यता असली तरी या दिवशी सरकारनं कोणतीही सुट्टी जाहीर केलेली नसल्याचं सरकारनं स्पष्ट केलं आहे.

**<><><><><>**

विद्यापीठ अनुदान आयोग आणि मुंबई विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने उद्या ६ तारखेला मुंबई विद्यापीठात 'विकास २०२५' या अखिल भारतीय विभागवार एक दिवसीय परिषदेचं आयोजन करण्यात आलं आहे. शिक्षण आणि उद्योग क्षेत्रांमध्ये अधिक सशक्त समन्वय साधणं आणि राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या प्रभावी

अंमलबजावणी करण्याच्या उद्देशानं ही परिषद आयोजित करण्यात आली आहे. मंत्री, शिक्षण तज्ज्ञ या परिषदेला मार्गदर्शन करणार आहेत. या पश्चिम विभागीय 'विकास २०२५' परिषदेत महाराष्ट्र, गोवा आणि गुजरात इथून सुमारे ५०० मान्यवर सहभागी होणार आहेत.

**<><><><><>**

नाशिक जिल्ह्यात नाशिक कळवण मार्गावर  काल रात्री उशिरा झालेल्या वाहन अपघातात पाच जणांचा मृत्यू झाला तर दोघे जण जखमी झाले. भरधाव वेगाने जाणाऱ्या चारचाकीवर चालकाचं नियंत्रण सुटल्यामुळे ती रस्त्याजवळच्या एका बंगल्याला धडकल्याने हा अपघात झाला. या अपघातात जखमी झालेल्या दोघांवर कळवण उप - जिल्हा रुग्णालयात प्रथमोपचार झाल्यानंतर त्यांना नाशिक इथं खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे.

**<><><><><>**

अमरावती जिल्ह्यात धारणी तालुक्यासह अकोला आणि बुलढाणा या जिल्ह्यांच्या उत्तर भागात काल रात्री भूकंपाचे सौम्य धक्के जाणवले. ३ पूर्णांक ८ दशांश रिक्टर स्केल तीव्रतेच्या या धक्क्यांचा केंद्रबिंदू धारणी तालुक्यात शिवझिरी इथं होता. या भूकंपामुळे कोणतीही हानी झालेली नाही.